Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

## * Central Library *

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 02/04/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

# दिनविशेष

## भारतीय क्रिकेटपटू रणजीत सिंह



रणजीत सिंह हे भारताचे पहिले आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू होते. त्यांचा जन्म १० सप्टेंबर १८७२ साली 'काठीयावाड'मध्ये झाला होता. रणजी यांना लहानपणापासूनच क्रिकेटमध्ये आवड होती. त्यांनी लहानपणीच वयाच्या ११ व्या वर्षी १८८३ साली पहिल्यांदा आपल्या शालेय जीवनात क्रिकेट खेळले होते आणि त्याच्या पुढच्याच वर्षी ते शाळेच्या क्रिकेट संघाचे कर्णधारदेखील झाले होते. सर्वप्रथम १९३४-३५ साली 'रणजी ट्रॉफी' ही स्पर्धा खेळवण्यात आली होती. याच्या पहिल्या हंगामात पटियालाचे महाराजा भूपिंदरसिंग यांनी या स्पर्धेतील चषक (ट्रॉफी) दान दिले होते. या स्पर्धेतील पहिला सामना मद्रास विरुद्ध मैसूर असा रंगला होता. हा सामना चेन्नईच्या चेपॉक मैदानावर खेळविण्यात आला होता.

रणजीत सिंह यांनी भारतीय क्रिकेटच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावली होती. रणजी एक उत्कृष्ट असे फलंदाज होते. त्यांनी १५ कसोटी सामने खेळले होते. ज्यामध्ये त्यांनी २ शतके आणि ६ अर्धशतकांचा मदतीने ९८९ धावा केल्या आहेत. तसेच ३०७ प्रथम श्रेणी सामने खेळले होते. ज्यामध्ये त्यांनी तब्बल २४,६९२ धावा केल्या होत्या. यामध्ये कसोटी सामन्यातील त्यांची सर्वोच्च खेळी ही १७५ धावांची होती, तर प्रथम श्रेणीमध्ये यांची सर्वोच्च धावसंख्या ही नाबाद २८५ अशी होती. रणजीत सिंह यांना १९०७ मध्ये 'महाराजा साहब नवानगर' ही उपाधी मिळाली होती. तसेच रणजीत सिंह हे रणजी राजांच्या गटाचे कुलपती (चांसलर) देखील राहिले होते. त्यांनी लीग ऑफ नेशन्समध्ये भारताचे प्रतिनिधित्वदेखील केले होते. २ एप्रिल १९३३ साली वयाच्या ६० व्या वर्षी त्यांनी जगाचा निरोप घेतला.

Nashik Edition

Apr 02, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401